## झलक अल्केमिस्ट्रीची



### बाळासाहेब ठाकरे:

चाळीस वर्षे महाराष्ट्राच्या केंद्रस्थानी. पण हे त्यांना स्वतःलाच माहीत नसावे. कारण दहा टक्के नियोजन, दहा टक्के श्रम आणि ऐंशी टक्के योगायोग. असा योगा'योगी' भारताच्या इतिहासात दुसरा नाही. सध्या हे शिवसेनाप्रमुख. गेली चाळीस वर्षे. (केव्हा गेली हे कळलंच नाही!)

### प्रविण दरेकर :

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा लघुत्तम साधारण विभाजक (लसावि). राज ठाकरेंचे नेताजी पालकर. भालजी पेंढारकर हयात असते तर यांच्या जीवनावर चित्रपटही काढू शकले असते. दुर्दैव. ते नाहीत. दुसरं काय? सध्या मागाठणे भागाचे मनसेचे भावी आमदार! मनसेचे सरचिटणीस. कंत्राटदारी कामगार सेनेचे अध्यक्ष. शिवाय इतर अनेक आगामी पदांचे उत्तराधिकारी. उत्तर मुंबईत राज ठाकरे यांचे नेते आहेत की हे राज ठाकरेंचे नेते आहेत याविषयी जोरदार संभ्रम आहे.

### बाबासाहेब पुरंदरे:



ठाकरे कुटुंबात ह्यांना बाबासाहेब आंबेडकरांएवढा व्यासंग असल्याचा मान दिला जातो! शिवाजी महाराजांबद्दल खुद्द महाराजांपेक्षा अधिक माहिती असल्याचा समज पसरवण्यात यश. 'जाणता राजा'चे प्रयोग इतके केले की जाणता राजा प्रयोगातच राहणार की काय? अशा प्रकारची भीती महाराष्ट्रभर. राज ठाकरे यांच्या प्रेमात. हे उद्धव ठाकरेंच्या प्रेमात. हा प्रेमत्रिकोण प्रकाश मेहरांना आकर्षित करू शकणारा. पण ते गेले. सुटले. एकेकाळी प्रबोधनकारांनी 'बाळ' महाराष्ट्राला दिला, बाबासाहेबांनी 'प्रसाद' पुण्याला दिला! प्रसादने शिवचरित्र वाचलेले नाही अशी पुण्यात अफवा आहे. बाबासाहेबांनी शिवचरित्रकार म्हणून अपार मेहनत घेतली. त्यामुळेच महाराष्ट्रात अनेक वाद निर्माण झाले. त्यामुळे त्यांना फार मनस्ताप सोसावा लागला. मला हे त्यांच्या आशीर्वाद देण्याच्या स्टाईलमुळे आवडतात. मुख्य म्हणजे, त्यांनी मलाही आशीर्वाद दिलाय. त्यामुळेच मी एवढा धीट झालोय!

मांडवाखालून गेलो. काहींचं बारसं जेवलो! काहींचं लग्न! काहींना खांदा दिला (रडण्यासाठी)! काहींच्या खांद्यावर रडण्याचा प्रयत्न केला. काहींच्या नावाने बोटं मोडली. तर काहींची बोटंच मोडली. या साऱ्याचा लेखाजोगा आत्मचरित्र लिहिण्याअगोदर एकदा घ्यावा असं मनात आलं. बाळासाहेब ठाकरे आत्मचरित्र लिहिणार नाहीत. कारण त्यांच्यापाशी कधी काही सांगण्यासारखं नव्हतंच! माझ्यापाशी गोळा करण्यासारखं काही नाही, पण सांगण्यासारखं बरंच आहे! हा प्रश्न तुलनेचा नाही तर स्तराचाच आहे. मी अनेक स्तरातल्या माणसांना सतत भेटत असतो. मुळात मी एकलकोंडा आहे. जेवण झालेल्या ॲनाकोंडासारखं वर्षानुवर्ष स्वस्थ पडून रहायला मला आवडेल. पण मनातला हा माणसांना भेटण्याचा, भेटण्यापेक्षा जाणून घेण्याचा जिज्ञासेचा कीडा स्वस्थ बसू देत नाही. मुंबईतले अनेक भामटे अब्जोपती बिल्डर किती बिनडोक आहेत हे पाहताना आपण अजून गरीब कसे? असा मला प्रश्न पडतो.

मन अलिकडे भ्रष्टाचाराने व्यथित होत नाही. एवढा कोडगा मी झालेलो आहे. पण भ्रष्टाचार करणाऱ्यांचे प्रकार असतात. ते सर्व प्रकार फार इंटरेस्टिंग असतात. त्यात मला लेखक म्हणून खूप रस वाटतो. कोर्टाचे जज जेव्हा भ्रष्टाचार करतात तेव्हा त्यांची भाषा वेगळी असते. एखादा नगरसेवक जेव्हा भ्रष्टाचार करतो तेव्हा त्याची भाषा वेगळी असते. ती ऐकताना खऱ्या भाषा या हिंदी, इंग्रजी, मराठी, तेलुगु वगैरे नसून भ्रष्टाचाराची भाषा हीच खरी भाषा आहे असं मी छातीठोकपणे सांगू शकतो. कारण आपला समाज आज याच भाषेवर चालू आहे.

जगभर विज्ञानाची प्रगती होण्याअगोदर असा कोणतातरी परिस असावा ज्यायोगे लोखंडाचं सोनं होण्याची किमया होऊ शकेल असं अनेक शास्त्रज्ञ मानायचे. त्यात न्यूटनही होता असं म्हणतात. पण तो प्रयोगाद्वारे लोखंडाचं सोन्यात परिवर्तन करू पाहणाऱ्यांतला होता. अल्केमिस्ट म्हणजे किमयागार या शब्दाची उत्पत्ती त्यातूनच आली. ही सारी भेटलेली, भेटणारी, भेटू इच्छिणारी, भेटू शकणारी माणसं मला त्या काल्पनिक परिसासारखी वाटतात. किंवा त्यांचे प्रयोग हे सोन्याच्या शोधाच्या प्रयोगासारखे वाटतात. खरं सोनं स्वतंत्रच आहे. एखाद्या बेटासारखं.

जगाच्या आणि समाजाच्या प्रयोगशाळेत तुमच्या आमच्यांवर प्रयोग (मग ते शुभंकर असो वा भयंकर) करणाऱ्या या सर्व 'शास्त्रज्ञां'शी माझी नाळ जोडली जातेच असं नाही. थोडक्यात त्यांची माझी केमिस्ट्री जुळतेच असं नाही. पण तरीही त्यांच्या प्रयोगात डोकावण्याचा मोह मला एक लेखक म्हणून आवरत नाही. माझा अत्यंत आवडता लेखक गॅब्रियेल ग्रोशिया मार्क्वेझ याचं एक न्यूज ऑफ किडनॅपिंग नावाचं पुस्तक आहे. ते त्याचं सर्वात सुंदर व एकमेव नॉन फिक्शन. पाब्लो एस्कोबार या मेक्सिकन डॉनच्या आयुष्यातल्या एका एपिसोडपासून सुरुवात होत एस्कोबारच्या मृत्यूपर्यंत (त्याला पोलिसांनी फोन नंबरवरून माग काढत छतातून हेलिकॉप्टरमधून गोळ्या घातल्या होत्या.) या पुस्तकात मार्क्वेझ आणि पाब्लो एस्केबारची एक केमिस्ट्री जमलेली दिसते. (ते एकमेकांना ओळखत नव्हते वा भेटलेही नव्हते.) ती मला 'अल्केमिस्ट्री' वाटते.

माझ्या आयुष्यातल्या मला शुभंकर वा भयंकर वाटणाऱ्यांसोबत माझी अशीच अल्केमिस्ट्री जुळून जाते. तीच अल्केमिस्ट्री मी पुढच्या आठवड्यापासून लोकप्रभाच्या वाचकांसाठी आणतोय. या अल्केमिस्ट्रीत जी माणसं तुम्हाला भेटतील त्यांनी माझ्या आयुष्यावर प्रयोग केलेत. मी ही त्यांच्या आयुष्यावर प्रयोग केलेत. पण आम्ही नेहमीच एकमेकांना भेटलोय असं नाही.

'मातृभूमीकरता मी मरेन' असं म्हणणारा कधीच मातृभूमीला विजय मिळवून देऊ शकत नाही. जो शत्रूला त्याच्या मातृभूमीकरता मरायला लावतो तो जिंकतो. हे नव्याण्णव टक्के जणांना कळत नाही. ते बोलायला तरी का होईना मी, मातृभूमीकरता मरेन असं म्हणतात. हा न प्राप्त होणारा सोन्याचा शोध आहे. हे काम अल्केमिस्टचं आणि माझं त्यांच्याशी जुळलेलं नातं अल्केमिस्ट्री. यात तुम्हाला शंभरातले नव्याण्णव भेटतील. उरलेला एक हा स्तंभ लिहितोय!

raju.parulekar@gmail.com